**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. नरेश बाळकृष्ण मोरे
मु.पो.जेजूरी, ता.पुरंदर,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,**
ढोले पाटील रोड, पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
मार्तंड देवस्थान ट्रस्ट,
ता.पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७०५/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२/०६/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८/०८/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** जेजूरी येथील वंशपरंपरागत पुजारी हक्काबाबतच्या मूळ कागदपत्रांच्या नकला | |

<u>विवेचन</u>

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता श्री. नरेश बाळकृष्ण मोरे यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.राजेंद्र रामचंद्र इंगवले
गिताई निवास, राहूल चेंबर्स,
एरंडवणे, कर्वे रोड,
पुणे-४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,**
पंचायत समिती मुळशी (पौड) ता.मुळशी,
जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत भूगांव, ता.मुळशी,
जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७०८/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६/१०/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६/११/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७/११/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**सर्वे नं.५१३ व ५१६ मधील बांधकामा संदर्भातील उदा. परवानगी पत्र अकृषिक दाखला, ग्रामपंचायत ठराव, तदनुषंगिक ३ मुद्दे | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. राजेंद्र रामचंद्र इंगवले यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत सादर केलेला अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती मुळशी (पौड) ता.मुळशी, जि.पुणे यांचा दि.२७/११/२००८ चा निर्णय योग्य असून सदरचा निणर्य कायम करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती मुळशी (पौड) ता.मुळशी, जि.पुणे यांनी दि.२७/११/२००८ रोजी दिलेल्या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत भूगांव, ता.मुळशी, जि.पुणे यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास त्वरित सादर करावा. त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठवावी.

**पुणे.**
**दि :-** 31 MAR 2010

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. जे.सी.परेरा
हाऊस नं.४०, ॲक्सोना, उतरोदा,
मजोरदा, सॅलसेट, गोवा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक (तां.से.),**
गुन्हे अन्वेषण विभाग, शिवाजीनगर,
पुणे-५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा संचालक पोलीस अधीक्षक,**
अंगुलि मुद्रा केंद्र, गुन्हे अन्वेषण विभाग, शिवाजीनगर
पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७४३/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०/१०/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५/११/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९/११/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७/१२/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** उपसंचालक, अंगुलि मुद्रा केंद्र, गुन्हे अन्वेषण विभाग, गोवा यांना पाठविलेल्या अंतिम मत प्रदर्शन अहवालावर सही करणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे व पदनामे, अहवालाची प्रत, अहवाल टंकलेखीत केलेल्या कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम, दि.६/०९/२००८ रोजीच्या पत्रावर स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२५/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्त्यास काही माहिती मुदतीत देण्यात आली मात्र मुद्दा क्र.२ ची माहिती दिली नाही. ' माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कलम ८(छ) (ज) अन्वये तपासाबाबत गुप्तता राखण्यासाठी व सुरक्षा प्रयोजनासाठी विश्वास पूर्वक दिलेल्या माहितीच्या स्त्रोताबाबतची माहिती अपीलकर्त्यास देण्यात आलेली नाही', असे जन माहिती अधिकारी तथा संचालक पोलीस अधीक्षक, अंगुलि मुद्रा केंद्र, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे श्री.आर.एम.चांदवीलकर व अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक (तां.से.), गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे डॉ.डी.एस.चव्हाण यांनी प्रपत्रात व सादर केलेल्या पूरक कागदपत्रांत नमूद केले आहे. ते व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 31 MAR 2010

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. तुकाराम रावसाहेब पवार
५८५/३, सोपान महाराज सहकारी सोसायटी,
मार्केट यार्ड, पुणे-३७

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय पुरंदर (सासवड),
जि.पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी त[illegible] [illegible]वासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्याल[illegible] [illegible]सास[illegible]),
जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७५१/पुणे |
| २ | **मूळ अ[illegible]न्वये केलेली मागणी :-** जन माहिती अधिकारी श्री.गायकवाड यांना प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दंड केला आहे काय, जन माहिती अधिकाऱ्यांनी दंडाची रक्कम भरणा केली आहे काय, असल्याचा त्याचा दिनांक व सदर दंडाच्या आदेशाविरुध्द जन माहिती अधिकाऱ्यांनी [illegible]ल केले आहे काय? याबाबतचे खुलासे | |

विवेचन

अपीलकर्ता श्री. तुकाराम रावसाहेब पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने सदर कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत त्यांना आयोगाच्या

दि.१३/०१/२००९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. तथापि अद्यापही अपीलकर्ता श्री.पवार यांनी [illegible]

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२६/०५/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. पवार हे उपस्थित होते तथापि त्यांनी प्रपत्रावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला. 'अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियमान्वये जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज न करता अपिलीय प्राधिकाऱ्यांच्याकडे दोन वेळेला अपील दाखल केले होते, तरीदेखील अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती मागणीच्या दिनांकापासून चार दिवसांत त्यांना देण्यात आली आहे', असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पुरंदर (सासवड), श्री.एस.व्ही.चं[illegible] [illegible] अधिकारी तथा तहसीलदार, [illegible] [illegible]ासह प्रपत्रात नमूद केले आहे.

[illegible] उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

[illegible]

अपील [illegible] आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. दादासो यादवराव पवार
मु.पो.चिंचणी, ता.शिरुर,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
केडगाव विभाग, ता.दौंड,
जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
शिरुर, ता.शिरुर,
जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७५९/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे चिंचणी, मौजे निंमोजे, मौजे गुनाट/धुमाळवाडी व शिंदोडी, ता.शिरुर या चार गावांच्या कार्यक्षेत्रातील ट्रान्सफॉर्मर व एच.टी.लाईनसाठीच्या मंजुरीच्या छायाप्रती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. दादासो यादवराव पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब तसेच जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. सदर कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत त्यांना आयोगाच्या

दि.१२/०२/२००९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. तथापि त्यांनी अद्यापपर्यंत वरील प्रमाणे कागदपत्रे आयोगास सादर केलली नाही.

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२४/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. पवार हे अनुपस्थित होते. 'अपीलकर्त्याच्या मागणीप्रमाणे माहिती तयार ठेवली असून ती घेऊन जाण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत रजिस्टर पोस्टाने कळविले होते. तरी देखील अपीलकर्ता हे माहिती घेऊन गेलेले नाहीत. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्रथम अपील केलेले नाही', असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शिरुर श्री. जी.व्ही.पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, केडगाव विभाग, श्री.एस.आर.वायफळकर यांनी पूरक कागदपत्रांसह प्रपत्रात नमूद केले आहे.

वरील बाबी व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विठ्ठल मारुती भोर
नर्मदा बंगला, मु.पो.राजगुरुनगर,
ता.खेड, जि.पुणे

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग,
पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष,**
आदिवासी शिक्षण संस्था सेवक संघ,
सुखकर्ता, अ-१०, माणिक चौक, राजगुरुनगर,
ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७७३/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३०/०१/२००८ |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८/११/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** आदिवासी शिक्षण संस्था सेवक संघाच्या, सभासदांची यादी संचालक मंडळाची यादी, संचालक मंडळात झालेले बदल, संचालकाचे मंजुर/नामंजुरी करण्यात आलेले राजीनामे, बँक खात्यावरील उलाढाल इ.एकूण ८ मुद्दे | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२५/०९/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'आदिवासी शिक्षण संस्था सेवक संघ' या संस्थेस शासनाचे कोणतेही अनुदान मिळत नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही

तरीदेखील अपीलकर्त्याच्या मागणीनुसार उपलब्ध माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, आदिवासी शिक्षण संस्था सेवक संघ, राजगुरुनगर श्री.बी.टी.आंधळे, यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

२) सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता श्री. विठ्ठल मारुती भोर यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. तसेच अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग यांनी दिलेल्या दि.२८/११/२००८ रोजीच्या आदेशामध्येही त्याची पुष्टी होत नाही. सबब श्री. विठ्ठल मारुती भोर यांच्या अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग यांनी दिलेले दि. २८/११/२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. दादासाहेब जोतीबा जाधव
मु.पो.बावडा, ता.इंदापूर,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा सरव्यवस्थापक,**
पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,
मुख्य कचेरी, ४-ब, बी.जे.रोड,
पुणे-१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा शाखा अधिकारी,**
पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,
बावडा, ता.इंदापूर,
जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७७९/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३/११/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८/११/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१/०५/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री भैरवनाथ सहकारी पाणी पुरवठा संस्था मर्यादित सुरवड या संस्थेने भरलेल्या दुप्पट व्याजाच्या रक्कमेतून १२३ सभासदांचे कर्ज, व्याज व पाणीपट्टी भरण्याबाबत संस्थेने बँकेकडे केलेल्या शिफारसपत्रांच्या छायाप्रती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२५/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री.

दादासाहेब जोतीबा जाधव हे अनुपस्थित होते. अपीलकर्त्यास त्यांच्या मागणीप्रमाणे आवश्यक असणारी माहिती विहित मुदतीत देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा शाखा अधिकारी, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, बावडा, ता.इंदापूर, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा सरव्यवस्थापक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अजिज अब्दुल मौलवी
राज्य माहिती आयोग कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-१ ..... **अपीलार्थी**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा

**जन माहिती अधिकारी तथा** प्रमुख लिपिक,
लेखा शाखा (आस्थापना संकलन),
जिल्हाधिकारी कार्यालय सातारा, जि.सातारा ..... **उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २११९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक ६.२.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. अजिज अब्दुल मौलवी राज्य माहिती आयोग कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, कौन्सिल हॉल समोर, पुणे-१<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा श्री. रमेश चव्हाण<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** प्रमुख लिपिक, लेखा शाखा (आस्थापना संकलन), जिल्हाधिकारी कार्यालय सातारा, जि.सातारा श्री. ए. एस. भिलावे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक २१.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक ४.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक २३.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक २.१२.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** मूळ माहिती अर्ज (जोडपत्र 'अ') ची प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती फक्त दोन पानात बसू शकत असताना पंधरा पाने छायांकित प्रती पाठविल्या. व्ही. पी. ने माहिती पाठविण्यासाठी शुल्क भरुन घेऊन माहिती समक्ष दिली, त्यामुळे ती रक्कम परत देण्यात यावी. प्रपत्रानुसार माहिती न देता पगार बिलाच्या छायांकित प्रती दिल्या, त्यात अन्य कर्मचाऱ्यांची आपण न मागितलेली माहिती आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. अजीज अब्दुल मौलवी यांनी केले.

कागदपत्रे आहे त्या स्वरूपात माहिती दिली. व्ही. पी. ची रक्कम घेतली व माहिती समक्ष दिली ही वस्तुस्थिती आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री. ए.एम. भिलावे यांनी केले.

आवश्यक त्या प्रपत्रात माहिती त्वरित द्यावी व व्ही. पी. साठी आकारलेले शुल्क जन माहिती अधिकाऱ्यांनी स्वतः अपीलकर्त्यास परत करावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. ३१.३.२०१०

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नरेंद्र काटकर
१०३ भैरटवाडी, पुणे -१६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक,
आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक,
आरोग्य सेवा कार्यालय, पुणे मंडळ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९६५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नरेंद्र काटकर
१०३ भैरटवाडी, पुणे -१६

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे डॉ.यु.एच.गावंडे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक,
आरोग्य सेवा कार्यालय, पुणे मंडळ, पुणे प्रतिनिधी श्री.एस.ई.कांडेकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.९.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२४.१०.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१८.११.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२९.१.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२.२.२०१० रोजी घेण्यात आली.

टंकलेखनाची नकली प्रमाणपत्रे दाखवून काही उमेदवारांची भरती केली असल्यामुळे या प्रमाणपत्राच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ कार्यालय, पुणे यांनी दिल्या नाहीत. तसेच तांत्रिक संवर्गातील पदे प्रतीक्षायादीच्या आधारे भरता येत नसूनही शासकीय निर्णय डावलून अतिरिक्त पदे भरण्यात आल्याबाबतचा खुलासा व कागदपत्रे दिली नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.नरेंद्र काटकर यांनी केली.

श्री.काटकर यांनी मागितलेली माहिती त्रयस्थ उमेदवारांची असल्यामुळे नाकारली. तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर अतिरिक्त पदांच्या भरतीबाबत स्पष्टीकरणात्मक तपशील देण्यात आला. शासन निर्णयाच्या प्रतीही दिल्या. टिपणीची मागणी अपीलकर्त्याने केलेली नव्हती , त्यामुळे दिली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ कार्यालय, पुणे श्री.एस.ई.कांडेकर यांनी केले.

टंकलेखनाची प्रमाणपत्रे नकली आहेत की नाही, अतिरिक्त भरती करण्याचा निर्णय योग्य की अयोग्य, हे अपीलकर्त्याचे मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचे नाहीत. अपीलकर्त्याने 'प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी करून घेण्याबाबत', म्हणजे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्तांकडून या प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी करून घेण्याची मागणी केली आहे, अशा स्वरूपाची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. तथापि, 'त्रयस्थ पक्षाच्या

स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल' अशा जन माहिती अधिकाऱ्यांनी नमूद केलेल्या कारणावरून भरती प्रक्रियेतील माहिती नाकारणे योग्य नाही. शासकीय कारभारात पारदर्शकता व शासकीय सेवकांचे उत्तरदायित्त्व हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. भरतीमधील स्पर्धात्मक प्रक्रिया पारदर्शक असणे आवश्यक आहे. म्हणून संबंधित उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रता दर्शविणाऱ्या कागदपत्रांच्या प्रती अन्य उमेदवारांना उपलब्ध असल्या पाहिजेत. त्यामुळे श्री.काटकर यांनी मागितलेल्या उमेदवारांच्या टंकलेखन प्रमाणपत्रांच्या प्रती व अतिरिक्त भरतीच्या संदर्भातील माहिती अपीलकर्त्यास आठ दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे डॉ.यू.एच.गावंडे यांनी दि.९.२.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५.३.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

डॉ. स्मिता मोहन झांबरे
सरस्वती, ७२/११, एरंडवणे,
पुणे-४११००४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव,**
एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ,
मुंबई

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्या,**
एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ होम सायन्स,
पुणे-४११०३८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०३४/पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १/१०/२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७/१०/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२/१२/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २/०१/२०१० |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** वरिष्ठ वेतन श्रेणी मिळणेसंदर्भात दि.३/०५/२००३ रोजी झालेल्या मुलाखतीचा निर्णय काय आहे,व सदरचा निर्णय उमेदवारास न कळविण्याबाबतची कारणे | |

## विवेचन

अपीलकर्त्या डॉ. स्मिता मोहन झांबरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलाच्या अनुषंगाने 'वरिष्ठ वेतनश्रेणी मिळणेसंदर्भात दि.३/०५/२००३ रोजी झालेल्या मुलाखतीचा निकाल व तो अद्याप कळविला न जाण्याच्या कारणांची माहिती अपीलकर्त्यास देऊन आयोगास अहवाल सादर करावा; असे निर्देश अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ यांना आयोगाने दिले. त्या अनुषंगाने अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ यांना दि.२/०१/२०१० रोजी सुनावणी घेऊन दिलेल्या निर्णयाने समाधान झाले असल्याचे, अपीलकर्त्या डॉ.झांबरे यांनी दि.२/०१/२०१० च्या पत्रान्वये आयोगास कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रविंद्रकुमार जयकुमार फडे
महावीर पथ, अकलूज, ता.माळशिरस
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक,**
सोलापूर ग्रामीण, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
अकलूज विभाग, अकलूज, ता.माळशिरस
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२३/२०१०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६/०२/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३/०५/२००९ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** अकलूज पोलीस ठाण्यातील गुन्हा रजिस्टर नंबर १२४/०४ च्या तपासाबाबतची माहिती व तपासात हलगर्जीपणा व दिरंगाई केल्यासंदर्भातील तक्रार अर्जाबाबतची माहिती व अनुषंगिक कागदपत्रे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. रविंद्रकुमार जयकुमार फडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र ब, अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे तसेच योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर )इ. जोडलेले नाही. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 31 MAR 2010

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रमाकांत भगवान साळुंखे
३५, प्रियदर्शनी हौसिंग सोसायटी, कुमठा नाका, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग-२, जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.५.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमाकांत भगवान साळुंखे
३५, प्रियदर्शनी हौसिंग सोसायटी, कुमठा नाका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.३.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.७.५.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाकडील तीन शाखा अभियंत्यांना सोलापूर जिल्हा परिषदेकडे प्रतिनियुक्ती दिली. शाखा अभियंत्यांना ज्या शासन निर्णयाच्या आधारे सोलापूर जिल्हा परिषदेकडे प्रतिनियुक्ती दिली, त्या शासन निर्णयाची प्रत जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग-२, जिल्हा परिषद, सोलापूर याच्याकडे आपण मागितली होती. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग-२, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी वेगळ्या विषयाशी संबंधित असलेल्या शासन परिपत्रकाची साक्षांकित प्रत दिली. तसेच अशा प्रकारच्या पदभरती, नियुक्ती संदर्भातील शासन आदेश आपल्या विभागाकडे नसल्यामुळे देता येत नसल्याचे कळविले. नियमबाह्य नियुक्त्यांवर पांघरूण घालण्याचा हा प्रकार असल्यामुळे आपण अपील केले. त्यानंतर आयोगाने आयोजित केलेल्या दि.१९.६.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'नंतर जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग-२, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी योग्य शासन निर्णयाची प्रत दिली. जी माहिती दि.१७.८.२००६ रोजी मिळणे आवश्यक होते, ती दि.२७.६.२००८ रोजी म्हणजे एक वर्ष दहा महिने दहा दिवस एवढ्या विलंबाने मिळाली. शासन निर्णयात नमूद केलेल्या विहित मार्गाने रिक्त पदे भरलेली नाहीत, हे त्यावरून स्पष्ट होते. माहिती देण्यास केलेल्या विलंबाबद्दल कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग-२, जिल्हा परिषद, सोलापूर यांना शास्ती लावावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.रमाकांत भगवान साळुंखे यांनी केले.

माहिती देण्यास झालेल्या विलंबाबद्दल व सुनावणीच्या वेळच्या अनुपस्थितीबाबत खुलासा करण्याच आदेश जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग-२, जिल्हा परिषद, सोलापूर यांना आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले व दि.७.५.२००९ च्या पत्रान्वये

अनुपस्थितीबाबत विचारणा केली. सुनावणीची सूचना आपल्याला न मिळाल्यामुळे आपण उपस्थित राहू शकलो नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग-२, जिल्हा परिषद, सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दि.२७.५.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले. तसेच दि.१.६.२००९ च्या पत्रान्वये 'माहिती अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर हे आहेत. या कार्यालयातील माहिती अधिकारी यांचा कोणत्याही प्रकारचा संबंध नाही,' असेही त्यांनी नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी अपीलकर्ता श्री.रमाकांत भगवान साळुंखे यांना माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत खुलासा दि.१५.४.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

(३) माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी केलेल्या कार्यवाहीविषयीचा अहवाल विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी त्याबाबतच्या आपल्या अभिप्रायासह आयोगास दि.१५.४.२०१० पर्यंत सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३१.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सदाशिव दत्तात्रय पाटील
कोथळी, ता.करवीर, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४६ / कोल्हापूर /२००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सदाशिव दत्तात्रय पाटील
कोथळी, ता.करवीर, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर
प्रतिनिधी श्री.एस.टी.भोसले

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.२.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.-- |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१८.३.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.-- |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण दि.१६.१.२००९ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे मागितलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. त्याऐवजी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी वेगळीच माहिती देण्याबाबत आदेश दिले. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी संबंधित अर्ज जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, करवीर याच्याकडे दिल्याचे तोंडी सांगितले. परंतु सहाय्यक निबंधक, करवीर यांनी अर्ज आपल्याकडे आला नसल्याचे लेखी दिले. आपला अर्ज अधिकाऱ्यांनी संगनमताने गायब केला व कारभारातील बेकायदेशीर गोष्टी उघड होऊ नयेत म्हणून माहिती दिली नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांना शास्ती व्हावी. अशी मागणी अपीलकर्ता श्री.सदाशिव दत्तात्रय पाटील यांनी केली.

अपीलकर्त्याने सहाय्यक निबंधकांकडे दिलेला अर्ज तालुक्याला हस्तांतरित केला होता, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री.एस.टी.भोसले यांनी सांगितले.

श्री.पाटील यांच्या अर्जाबाबत केलेल्या कार्यवाहीचा खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करवीर श्री.बी.ए.मोरे यांनी त्वरित करावा व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी अपीलकर्त्यास तीन दिवसांत माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर यांना दि.१८.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगाचे आदेश कळविले. तथापि आपल्याला माहिती मिळाली नाही, अशी तक्रार श्री.पाटील यांनी आयोगाकडे केली. तत्कालीन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करवीर श्री.बी.ए.मोरे यांना खुलासा करण्याबाबत अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा निबंधक, सहकारी

संस्था, कोल्हापूर यांनी दि.२०.११.२००९ च्या पत्रान्वये कळविले. आयोगाने स्मरण देऊनही असा खुलासा श्री.मोरे यांनी सादर केलेला नाही, त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात. तसेच सुनावणीच्या वेळी आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार माहिती न दिल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.सदाशिव दत्तात्रय पाटील यांनी केली आहे. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यानी दि.२४.२.२००९ रोजी पाठविलेला अर्ज आपल्याकडे प्राप्त झालेला नाही, असे दि.२३.७.२००९ च्या पत्रान्वये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.करवीर, जि.कोल्हापूर यांनी श्री.पाटील यांना कळविल्याचे दिसते. तथापि अर्ज त्यांच्याकडे वर्ग केल्याचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या प्रतिनिधीने स्पष्ट केले असून आवश्यक तर प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळीही हा अर्ज सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.करवीर हे प्राप्त करून घेऊ शकले असते. त्यांनी तसे केलेले नाही. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री.बी.ए.मोरे यांनी आयोगाच्या आदेशानुसार कार्यवाही केलेली नाही, व अपीलकर्त्यास अद्याप माहिती दिलेली नाही. त्यामुळे तेही शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री.बी.ए.मोरे यांनी अपीलकर्ता श्री.सदाशिव दत्तात्रय पाटील यांना माहिती दिलेली नाही. यासाठी त्यांना रूपये २५००० इतकी शास्ती लावण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री.बी.ए.मोरे यांच्याकडून अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी जन माहिती अधिकारी यांच्या (सेवानिवृत्त झाले असल्याने ) मार्च २०१०, एप्रिल २०१०, मे २०१० या महिन्यांच्या अनुक्रमे एप्रिल २०१०, मे २०१० व जून २०१० मध्ये

मिळणाऱ्या निवृत्तीवेतनातून तीन समान हप्त्यांत ही शास्ती वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी. तसेच कार्यवाही करून त्याचा अहवाल आयोगाला सादर करावा.

(३) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका करवीर, जि.कोल्हापूर श्री.एस.एस.शिंगटकर यांनी अपललकर्त्यास माहिती दिली नाही व त्याबाबतचा खुलासाही सादर केला नाही. त्याबद्दल त्यांना रूपये २५००० शास्ती करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका करवीर, जि.कोल्हापूर श्री.एस.एस.शिंगटकर यांच्याकडून अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी जन माहिती अधिकारी यांच्या मार्च २०१०, एप्रिल २०१०, मे २०१० या महिन्यांच्या अनुक्रमे एप्रिल २०१०, मे २०१० व जून २०१० मध्ये मिळणाऱ्या वेतनातून तीन समान हप्त्यांत ही शास्ती वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१५.३.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनिल बा.उंबरकर
दि फॅमिली शॉपी, मेन स्ट्रीट, पाचगणी, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा न्यायाधीश, सहकार न्यायालय, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा न्यायालयीन लिपिक, सहकार न्यायालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५१ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुनिल बा.उंबरकर
दि फॅमिली शॉपी, मेन स्ट्रीट, पाचगणी, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा न्यायाधीश, सहकार न्यायालय, सातारा प्रतिनिधी श्री.एन.डी.पवार

**जन माहिती अधिकारी** तथा न्यायालयीन लिपिक, सहकार न्यायालय, सातारा श्री.एन.डी.पवार

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.१.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.५.२.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.१.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.९.४.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सहकार न्यायालयातील दाव्याच्या संदर्भात आपल्या आईच्या वतीने आपण मागितलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्रयस्थ पक्षाची माहिती असल्याच्या कारणावरून जन माहिती अधिकारी तथा न्यायालयीन लिपिक, सहकार न्यायालय, सातारा यांनी नाकारल्या. आपण श्रीमती वासंती बापूसाहेब उंबरकर यांचे कायद्याने वारस असल्यामुळे आपल्याला माहिती मिळावी व जन माहिती अधिकारी तथा न्यायालयीन लिपिक, सहकार न्यायालय, सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा न्यायाधीश, सहकार न्यायालय, सातारा यांनी दिलेला निर्णय रद्दबातल ठरवावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सुनिल बा.उंबरकर यांनी केली.

अपीलकर्ता हे मूळ दाव्यातील पक्षकार नाहीत. त्रयस्थ पक्ष म्हणून त्यांना माहिती हवी असल्यास मुंबई उच्च न्यायालयाने माहिती देण्याबाबत केलेल्या नियमानुसार विहित प्रक्रियेचा अवलंब करून माहिती प्राप्त करून घ्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा न्यायाधीश, सहकार न्यायालय, सातारा यांनी दिला. त्यानुसार अपीलकर्त्यास आवश्यक तर माहिती देण्यात येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा न्यायालयीन लिपिक, सहकार न्यायालय, सातारा श्री.एन.डी.पवार यांनी केले.

त्रयस्थ व्यक्तीची माहिती म्हणून जन माहिती अधिकारी तथा न्यायालयीन लिपिक, सहकार न्यायालय, सातारा यांनी दिलेले उत्तर योग्य असले तरी त्या व्यक्तीचे ना हरकत पत्र अपीलकर्त्याने दाखल केल्यास अपीलकर्त्यास माहिती दिली जाणे आवश्यक आहे. माहितीचा उद्देश विचारता येणार नाही, अशी स्पष्ट तरतूद संसदेने पारित केलेल्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये आहे. त्यामुळे 'उद्देश नमूद करणारे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याची' अट वैध ठरत नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा न्यायालयीन लिपिक, सहकार न्यायालय, सातारा यांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्याने त्रयस्थ पक्षाचे ना हरकत पत्र सादर केल्यास मूळ अर्जानुसार मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा न्यायालयीन लिपिक, सहकार न्यायालय, सातारा यांनी उद्देश नमूद करण्याचे बंधन न घालता निःशुल्क द्यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.** 31 MAR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. शिवाजीराव सूर्यभान क्षिरसागर
मु. पो. चाटे गल्ली, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
जि. प. उप विभाग, बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५२ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००९ |
| ३ | **उपस्थिती :-**<br>**अपीलकर्ता :** शिवाजीराव सुर्यभान क्षिरसागर मु. पो. चाटे गल्ली, वैराग, ता. बार्शी , जि. सोलापूर<br>**अपिलीय प्राधिकारी तथा:-** गटविकास अधिकारी, पंचायत समिती बार्शी, जि. सोलापूर श्री.ए.एन.नागरगोजे<br>**जन माहिती अधिकारी तथा :-** उप अभियंता, जि. प. उप विभाग, बार्शी, जि. सोलापूर श्रीमती सु.अ.पाटील | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१.२.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.११.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

रस्त्याच्या कामासंबंधाची आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद उपविभाग, बार्शी, जि.सोलापूर यांनी विहित मुदतीत पूर्ण दिली नाही. काही कामांच्या संदर्भात उच्च न्यायालयाने चौकशीचे आदेश दिलेले असताना केलेली चौकशी खोटी आहे. रावळेगाव ते आळजापूर हा रस्ता अस्तित्वात नसताना काम केल्याचे दाखविले. या सर्व प्रकरणात भ्रष्टाचार असून तो उघड करण्यासाठी कायदेशीर कारवाई करण्याकरिता माहिती मिळणे आवश्यक असताना वेगळीच माहिती दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शिवाजीराव सूर्यभान क्षीरसागर यांनी केली.

श्री.क्षीरसागर यांनी सन १९९८ पासूनची माहिती मागितली होती. जिल्हा परिषद उपविभाग, बार्शी अंतर्गत विविध खात्याकडील २६ योजनांची अंमलबजावणी केली जाते. त्या संदर्भातील, तसेच ग्रामीण स्वच्छता अभियान आदी अंतर्गत कामाचीही जबाबदारी या उपविभागाकडे असते. प्रदीर्घ काळातील विस्तृत माहिती व अपुरा कर्मचारीवर्ग यामुळे माहिती देण्यास विलंब होईल, याची श्री.क्षीरसागर यांना कल्पना देण्यात आली होती. माहिती मागणारे नंतर पाच अर्ज त्यांनी केले असून त्या संदर्भातील माहिती असणाऱ्या सर्व सहा.माहिती शाखा अभियंत्याना वेळोवेळी माहितीबाबत कळविले होते. त्यांच्याकडून माहिती प्राप्त होताच अपीलकर्त्यास कळविले. परंतु काही अर्जांमध्ये आपल्याला अपेक्षित माहिती नसल्याचे कारण दाखवून त्यांनी माहिती नाकारली व नंतर दि.२२.२.२००७ रोजी नि:शुल्क माहिती स्वीकारली. विहित मुदतीपेक्षा सुमोर तीन महिने पंधरा दिवस विलंब झाला आहे. तथापि माहिती प्राप्त झाल्यापासून ती स्वीकारण्यापर्यंतच्या कालावधीचा त्यात समावेश आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद उपविभाग, बार्शी, जि.सोलापूर श्रीमती सु.अ.पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास

अधिकारी, पंचायत समिती बार्शी, जि.सोलापूरश्री.ए.एन.नागरगोजे यांनी केले. त्यासाठी सोबत त्यांनी पूरक कागदपत्रे सादर केली.

संबंधित सहाय्यक माहिती अधिकारी यांना दिलेली स्मरणपत्रे व त्यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याचा तपशील याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद उपविभाग, बार्शी, जि.सोलापूर यांनी आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद उपविभाग, बार्शी, जि.सोलापूर श्रीमती सु.अ.पाटील यांनी दि.२३.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला अहवाल सादर केला. त्यात पुढीलप्रमाणे तपशील नमूद केला आहे :

**<u>सहाय्यक माहिती अधिकारी : -</u>**

१. श्री.एस.एस.सुरवसे, शाखा अभियंता
२. श्री.व्ही.एम.मोहिते, शाखा अभियंता
३. श्री.एस.जे.शेख, शाखा अभियंता
४. श्री.एस.के.पाटील, शाखा अभियंता
५. श्री.आर.जे.शेख, शाखा अभियंता
६. श्री.आर.डी.बनसोडे, शाखा अभियंता

| अ.क्र. | माहिती केस नं. / अर्ज | प्राप्त दिनांक | दिलेली स्मरणपत्रे | माहिती प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | ६० | ७.१०.२००६ | ०३ | १८.१२.२००६ |
| २ | ६१ | ७.१०.२००६ | ०३ | ११.१२.२००६ |
| ३ | ६२ | ७.१०.२००६ | ०४ | २३.१.२००६ |
| ४ | ६३ | ७.१०.२००६ | ०४ | ३१.१.२००७ |
| ५ | ६४ | ७.१०.२००६ | ०३ | ८.१२.२००६ |

संबंधित सहाय्यक जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती संकलनाबाबत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती सोबत जोडल्या आहेत. हा तपशील लक्षात घेता माहिती नाकारण्याचा अथवा टाळण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी व सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी केलेला दिसत नाही. माहितीची विस्तृत मागणी व एकाच दिवशी केलेले पाच विविध अर्ज व त्या संदर्भात एकच

अपील ही अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. उपविभागाकडे माहिती उपलब्ध होताच माहिती निःशुल्क घेऊन जाण्याबद्दलचे पत्र जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास पाठविल्याचे कागदपत्रांवरून दिसते. या बाबी लक्षात घेता विलंब क्षमापित करण्याची जन माहिती अधिकाऱ्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१७.३.२०१०**